**खाजगी बाजार व थेट पणन अनुज्ञाप्ती परवानाधारकांना सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना सोयाबीन अनुदान योजनेचा लाभ देणेबाबत (२०१६-२०१७)**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक: सपस-२०१८/प्र.क्र. ३०९/२४ स**
मंत्रालय, विस्तार, मुंबई-३२
दिनांक:- **८ मार्च, २०१९**

**संदर्भ**:-१) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
क्रमांक: सपस-२०१७/प्र.क्र. ५ /२४ स, दिनांक १० जानेवारी, २०१७
२)शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
क्रमांक: सपस-२०१७/प्र.क्र. ५ /२४ स, दिनांक ८ ऑगस्ट, २०१७

**प्रस्तावना:-**

खरीप हंगाम २०१६-२०१७ मध्ये राज्यात सोयाबीनच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे सोयाबीनच्या दरात झालेल्या घसरणीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी शासन निर्णय, दिनांक १०/१/२०१७ अन्वये माहे ऑक्टोबर २०१६ ते डिसेंबर,२०१६ या कालावधीत राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये २००/- व जास्तीत जास्त २५ क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे अनुदान मंजूर केले होते. सदर अनुदानाचा लाभ महाराष्ट्र राज्य कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियम) १९६३ मधील नियम ४ ब मधील तरतूदीनुसार परवानाप्राप्त खाजगी बाजार व थेट पणन अनुज्ञाप्ती परवानाधारकांना सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना देण्यासाठी शासन निर्णय,दिनांक ८/८/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. याअंतर्गत ११ खाजगी बाजार संस्था व १६ थेट पणन परवानाधारकांना सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्याना सोयाबीन अनुदानाचा लाभ मिळणार आहे. सदर योजनेंतर्गत अन्य ४ खाजगी बाजार समित्यांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

शासन निर्णय,दिनांक १०/१/२०१७ व दिनांक ८/८/२०१७ मधील अटी व शर्तीच्या अधीन राहून खालील ४ खाजगी बाजार समित्यांचा सोयाबीन अनुदान योजनेत समावेश करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

१. संत नामदेव खाजगी बाजार समिती, सेनगांव, जि. हिंगोली
२. आदर्श खाजगी बाजार समिती हिंगोली
३. ना.ना. मुंदडा कृषि उत्पन्न बाजार समिती,मालेगाव,जि.वाशिम
४. शेतकरी कृषि उत्पन्न बाजार दत्तरामपूर आर्णी, यवतमाळ

२. योजनेशी संबंधित शासन निर्णयातील नमूद अटींचे उल्लंघन केल्यास खाजगी बाजार व थेट पणन अनुज्ञाप्ती परवानाधारकांचा परवाना रद्द करण्याची कारवाई पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करावी.

३. या योजनेंतर्गत खाजगी बाजार व थेट पणन अनुज्ञाप्ती परवानाधारकांकडून प्राप्त होणाऱ्या सर्व प्रस्तावांच्या कागदपत्रांची छाननी करुन सोबतच्या **विवरणपत्र १** च्या विहित नमुन्यात माहिती सादर करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांची राहिल.

४. जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे पात्र लाभार्थ्यांची यादी व अनुदानाची रक्कम निश्चित करण्याची जबाबदारी पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

५. खाजगी बाजार व थेट पणन अनुज्ञाप्ती परवानाधारकांकडील पात्र लाभार्थ्यांची यादी व अनुदानाची रक्कम याबाबतचा प्रस्ताव पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी ३० दिवसांत शासनास सादर करावा.

६. सोयाबीन अनुदानाबाबत भविष्यात महालेखापाल कार्यालयाकडून मुद्दे उपस्थित झाल्यास सर्व संबंधित कागदपत्रे सादर करण्याची जबाबदारी संबंधित खाजगी बाजार व थेट पणन अनुज्ञाप्ती परवानाधारक, संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था आणि पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

७. सदर योजनेचा लाभ देण्यासाठी पात्र लाभार्थ्यांची यादी व त्यांना द्यावयाचे अनुदान याबाबतचा प्रस्ताव पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सादर केल्यानंतर अनुदानासाठीचा आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०८१२५८५२५३०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Ghadyale Sunanda Mohanrao

Digitally signed by Ghadyale Sunanda Mohanrao
DN: CN = Ghadyale Sunanda Mohanrao, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Co-operation, Marketing and Textiles
Date: 2019.03.08 13:02:16 +05'30'

**(सुनंदा मो.घडयाळे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. मंत्री (सहकार, पणन व वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
३) मा. राज्यमंत्री ( पणन ) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
४) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
६) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७) कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे
८) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
९) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
१०) अध्यक्ष, कृषी उत्पन्न बाजार समिती(सर्व)
११) महालेखापाल, महाराष्ट्र-१ /२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा ), मुंबई/नागपूर,
१२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
१४) वित्त विभाग, व्यय-२/अर्थसंकल्प-११, मंत्रालय, मुंबई-३२
१५) अवर सचिव १७ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६) निवड नस्ती २४ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

विवरणपत्र १

**खाजगी बाजार परवानाधारकाचे नांव/पत्ता**

**परवाना क्रमांक**

| अ. क्र. | शेतकऱ्याचे नांव, पत्ता व आधार क्रमांक | गेट रजिस्टर वर नोंदीचा अ.क्र. व दिनांक | गेटलिस्ट-प्रमाणे विक्रीसाठी आणलेल्या सोयाबीनचे प्रमाण क्विंटल | Auction करणाऱ्या व्यक्तीचे नांव | Auction रजिस्टर वरील अ.क्र. | Auction झालेल्या सोयाबीनचे परिमाण /क्विंटल | Auction झाल्यानंतर सोयाबीनला मिळालेला दर रु. प्रति क्विंटल | ७/१२ प्रमाणे सोयाबीन लागवडीचे क्षेत्र हेक्टर आर | पिक कापणी प्रमाणे उत्पादकता क्विंटल प्रति हेक्टर | CCE प्रमाणे सोयाबीनचे अपेक्षित उत्पादन क्विंटल | अनुदान पात्र सोयाबीनचे परिमाण क्विंटल | अनुदानाची रक्कम रुपये | शेतकऱ्याच्या ज्या बँक खात्यावर मूळ रक्कम अदा करण्यात आली आहे, त्या खात्याचा क्रमांक व IFSC Code | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | | | | | | | | | |

कागदपत्रांची पडताळणी केलेल्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम

अंतिम मान्यता दिलेल्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम

स्वाक्षरी

खाजगी बाजार समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी